# जमीन खरेदीसाठी मुदतवाढ नोटीस

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित अंतर्गत नवीन ७६५ के.व्ही.उपकेंद्रांसाठी खाजगी मालकी हक्काची अंदाजे ६०० x ६०० चौरस मीटर मापाची , अंदाजित ९० ते १०० एकर जडवाहतुक होण्यायोग्य रस्त्यालगत जमिनीची आवश्यकता आहे.

त्यासाठी या कार्यालयाने दिनांक २०.१.२०२६ रोजी नोटीस प्रसिद्ध केली व त्याची शेवटची तारीख २७.१.२०२६ पर्यंत १८:०० वाजेपर्यंत होती. परंतु सदर कालावधीत कुठलाही प्रतिसाद न मिळाल्यामुळे जमीन खरेदीसाठी मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे

उपरोक्त जमीन ही श्री.पेडकाई देवी मंदिर सोनगीर –दोंडाईचा राज्य महामार्ग क्रमांक ०१ (MSH-01) लगत (२१ अंश १३ मिनिट ४७ सेकंद उत्तर व ७४ अंश ३९ मिनिट ४०.९६ सेकंद पूर्व ) तालुका- शिंदखेडा , जिल्हा- धुळे या अक्षांश-रेखांश पासून ०३ कि.मी त्रिजेच्या अंतराच्या आत जमीन असणे आवश्यक आहे.

वरील वर्णनाची जमीन विक्री करणाऱ्या इच्छुक जमीन धारकांनी किंवा २ किंवा अधिक एकत्रित जमीन धारकांनी तसेच प्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या मुखत्यार पत्रासह संबंधित कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह स्वारस्य अर्ज नामनिर्देशित कार्यालयास सादर करावे.

१. अद्यावत ७/१२ उतारा.

२. खसरा नकाशा गाव नकाशासहित.

३. गाव नमुना ८ अ.

४. पोच नकाशा (लोकेशन मॅप).

५. जमीन धारकाने धारण केलेल्या जमिनीचा एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा.

६. जमिनीची लांबी, रूंदी व एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा.

७. जमीन जर कोणत्याही प्रकल्पात किंवा इतर कारणास्तव आरक्षित असल्यास जिल्हाधिकारी ह्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र किंवा जिल्हाधिकारी परवानगीसाठी कार्यालयात दाखल केलेल्या सेतू मार्फत अर्जाची प्रत अथवा पुरावा.

८. जमिनीचा एकरी दर.

वरील १ ते ८ प्रमाणे कागदपत्रे जोडून आपले स्वारस्य अर्ज, मोहरबंद लिफाफ्यामध्ये **दिनांक ०३.०२.२०२६ पर्यंत १८:०० वाजेपर्यंत** कार्यकारी अभियंता (स्थापत्य) ह्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर स्वहस्ते किंवा प्रतिनिधी मार्फत पोहचतील अशा बेताने पाठवावे. कोणत्याही कारणामुळे उशिरा प्राप्त होणारे स्वारस्य अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. कारण न देता कोणत्याही किंवा सर्व अर्ज नाकारण्यात येण्याचा हक्क हस्ताक्षर कर्त्या अधिकाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

**पत्ता:-** कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
अउदा स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग,
महापारेषण, जळगाव १३२ के.व्ही. उपकेंद्र जुने औद्योगीक सबस्टेशन जळगाव
जुने औद्योगीक परिसर ,अजिंठा रोड जळगाव -४२५००३
दूरध्वनी क. ९३७०९२६४२७ , ९०९६९९४६१६

कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
अउदा स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग, जळगाव